# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १२७ वा शनिवार दि.०७ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## विरोधी पक्षांचे प्रमुख नेते ईडीच्या रडारवर

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांच्या अटकेनंतर अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कारवाईवर विरोधक प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षातील बड्या नेत्यांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जात असल्याचा आरोप इंडिया आघाडीने केला आहे. भाजप आगामी निवडणुकीसाठी हे सर्व करत आहे, असे ते आरोप करत आहेत. इंडिया आघाडीचे १० हुन अधिक नेते ईडीच्या रडारवर आहेत. विशेष म्हणजे पक्षातील क्रमांक दोनच्या नेत्यांचा या लिस्टमध्ये समावेश आहे. तसेच काँग्रेसच्याही बड्या नेत्यांचा यात समावेश आहे.मेनस्ट्रीम मीडियासह स्वतंत्र पत्रकारितेला धोका निर्माण झाला आहे. अनेक जणांनी सरकारच्या वाढत्या प्रभावाला कंटाळून स्वतंत्र पत्रकारिता सुरु केली, पण सरकारविरोधात बोलल्याने त्यांनाही अटक किंवा चौकशीसाठी बोलावून त्रास दिला जात आहे, असा आरोप विरोधक करत आहेत. इंडिया आघाडीचा आरोप आहे की, भाजपला निवडणुकीपूर्वी मोठ्या विरोधी नेत्यांना तुरुंगात ठेवून निवडणुका जिंकायच्या आहेत. तसेच अनेक विरोधी नेत्यांचे म्हणणे आहे की, ईडी लोकांना निवडणुकीपूर्वी अटक करत आहे जेणेकरून त्यांना निवडणुकीपर्यंत जामीन मिळू नये. विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकूनही भाजप आपली डिपॉझिट वाचवू शकणार नाही, असे इंडिया आघाडीचे म्हणणे आहे.शिक्षण भरती घोटाळ्यात ईडीला अभिषेक बॅनर्जी यांची चौकशी करायची आहे. अभिषेक हे पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस असून अध्यक्षानंतरचे त्यांचे सर्वात शक्तिशाली पद आहे. ईडी राजकीय हेतूने नोटीस पाठवत आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. त्याचप्रमाणे ईडीला हेमंत सोरेन यांचीही चौकशी करायची आहे. ईडीने आतापर्यंत सोरेन यांच्या चौकशीसाठी ५ समन्स जारी केले आहेत. सोरेन हे झारखंडचे मुख्यमंत्री आहेत. उद्धव ठाकरेंनंतर संजय राऊत हे त्यांच्या पक्षाचे मोठे नेते आहेत. पत्रा चाळ घोटाळ्यातही विशेष न्यायालयाने राऊत यांना जामीन मंजूर करताना ईडीवर ताशेरे ओढले होते. अलीकडेच लालू कुटुंबीयांना सीबीआयने दाखल केलेल्या गुन्ह्यात दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टातून जामीन मिळाला आहे.रडारावरील प्रमुख नावे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसच्या



जेष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांचा समावेश आहे. तसेच राज्य काँग्रेसच्या अनेक नेत्यांचा यात समावेश आहे. तसेच झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव तृणमूलचे अभिषेक बॅनर्जी, शिवसेनेचे (ठाकरे गट) संजय राऊत, राष्ट्रवादीचे जयंत पाटील (शरद पवार) ही प्रमुख नावे आहेत.व्यवस्थापनाचीही जबाबदारी

लोकसभा निवडणुकीपूर्वी ईडीची कारवाई ज्या प्रकारे तीव्र झाली आहे, त्यामुळे विरोधी पक्षांचाही तणाव वाढला आहे. कारण, ईडीच्या रडारवर असलेले बहुतांश विरोधी नेते त्यांच्या पक्षाच्या निवडणूक व्यवस्थापनाचीही जबाबदारी सांभाळतात आणि पक्षाचे प्रमुख चेहरे आहेत.

## सरकारकडून हमीभावाने तांदळाची खरेदी सुरु

नवी दिल्ली : भारत सरकारने शेतकऱ्यांकडून किमान आधारभूतकिंमतीने तांदूळ खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. सरकारने आतापर्यंत १२.२१ लाख टन तांदळाची आधीच खरेदी केली आहे. अन्न मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, तामिळनाडू, पंजाब आणि हरियाणामधील ९९ हजार ६७५ शेतक–यांकडून २,६८९.७७ कोटी रुपयांचा तांदूळ खरेदी करण्यात आला आहे. यंदा काहीशा मोठ्या क्षेत्रावर पेरणी झालेल्या खरीप भाताची काढणी गेल्या आठवड्यात सुरू झाली.केंद्र सरकारकडून आधारभूतकिंमतीने तांदळाची खरेदी सुरु केली आहे. अन्न मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत किमान आधारभूतकिंमतीवर (एमएसपी) शेतक–यांकडून सुमारे १२.२१ लाख टन धान्य खरेदी करण्यात आले आहे. यावर्षी ४११.९६ लाख हेक्टरपेक्षा किंचित जास्त क्षेत्रावर पेरणी झालेल्या खरीप भाताची काढणी गेल्या आठवड्यात सुरू झाली. भारतीय अन्न महामंडळ आणि राज्य संस्थांनी बफर स्टॉक तयार करण्यासाठी तसेच शेतक–यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी एमएसपीवर खरेदी केली आहे. मंत्रालयाने चालू हंगामात ५२१.२७ लाख टन तांदूळ खरेदी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. जे मागील वर्षीच्या हंगामात ४९६ लाख टन खरेदी केले होते.उत्पादनात घट होण्याची शक्यता तांदळाच्या लागवडीचा हंगाम संपला आहे. यंदा लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे.

## हासोरी च्या भूकंप प्रतिबंधक उपाययोजनेसाठी आ. अभिमन्यू पवार यांचा मदत व पुनर्वसनमंत्र्याना फोन....

निलंगा – औसा विधानसभा मतदारसंघातील हासोरी बु. व हासोरी खु. येथे पुन्हा भूकंपाचे गूढ धक्के जाणवल्याने भीतीच्या वातावरण वावरत असलेल्या येथील ग्रामस्थांशी (दि.६) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी संवाद साधला. या दोन्ही गावांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून तात्पुरत्या स्वरूपातील टेंट मंजूर झाले असले तरी ग्रामस्थांनी टेंटऐवजी शेड उभारावे अशी मागणी केली. यासंदर्भात तिथूनच आ. अभिमन्यू पवार यांनराज्याचे मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापनमंत्री अनिल पाटील यांच्याशी संवाद साधला यावेळी मंत्रीमहोद्याने सदरील बाबींचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. या परिसरात वानरांची संख्या अधिक असल्याने त्या दृष्टीने टेंट सुरक्षित नाहीत. त्यामुळे आम्हाला निवारा म्हणून पत्र्याचे शेड देण्यात यावे हि ग्रामस्थांची मागणी असून माही या मागणीस सहमत आहे. गतवर्षी झालेल्या भूकंपाच्या सौम्य धक्क्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून तात्पुरत्या स्वरूपातील टेंट उभारणीस ३ कोटी ५ लक्ष रूपये मंजूर करण्यात आले होते. मात्र ग्रामस्थांची मागणी शेडची आहे. यासाठी आणखी १० कोटींची तरतूद करण्यात यावी अशी मागणी यावेळी फोनवरून बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापनमंत्री अनिल पाटील यांच्याकडे केली आहे. यावर याबाबत प्रशासनाने तातडीने प्रस्ताव सादर करण्यात यावे अशी सूचना त्यांनी केली. यावेळी आमदार अभिमन्यू पवार ग्रामस्थांशी बोलताना सांगितले की याबाबत लवकरच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधून याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात



येईल असे सांगितले. तसेच तहसीलदार यांना २ दिवसांमध्ये शेडचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. २०२२ च्या सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांमध्ये औसा विधानसभा मतदारसंघातील हासोरी बु. व हासोरी खु. (ता. निलंगा) या गावांमध्ये जाणवत असलेल्या सततच्या भूकंपाच्या सौम्य धक्क्यांमुळे या दोन्ही गावांमधील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. याबाबत आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव तसेच तत्कालीन प्रधान सचिव यांच्याकडेही पाठपुरावा केला होता.या पाठपुराव्यामुळे हासोरी बु. व हासोरी खु. येथे भूकंपाच्या अनुषंगाने तात्पुरते निवारे (टेंट) उभारण्यासाठी ३ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

## तुळजाभवानीच्या मंचकी निद्रेस प्रारंभ; १५ ऑक्टोबरला घटस्थापना

तुळजापूर : महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपिठा पैकी एक शक्ती पिठ श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिरात शेकडो वर्षापासून देविचे पुजारी वर्ग व मंदिर संस्थान कडून अनेक वेगवेगळ्या प्रथा परंपरा, रिती रिवाज जपल्या जात आहेत. यातील एक देविला मंचकी निद्रा ही एक परंपरा आहे.



शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमी होणा–या मंचकी निद्रेस शुक्रवारपासून (दि.६) प्रारंभ झाला आहे.तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेच्या दरबारात आई राजा उदो उदोच्या जयघोषात व संबळाच्या निनादात शुक्रवारी सायंकाळी मंचकी निदेचा विधी करण्यात आला. प्रारंभी सायंकाळच्या पंचामृत अभिषेक, विधिवत पुजन व आरती नंतर आई श्री तुळजाभवानीस शहानग्रहात नेण्या आले. शारदिय नवरात्र महोत्सवानिमित्त श्री. तुळजाभवाना मातेच्या या निद्रेस भोगनिद्रा म्हटले जाते. तुळजापूरच्या या मातेची मुर्ती चलमुर्ती असल्याने वर्षभरात तीन वेळेस या मुर्तीस मंचकी निद्रेच्या निमित्ताने सिंहासनावरून हलविले जाते. यात शारदीय नवरात्रच्या अगोदर व नंतर तसेच पौष महिन्यात शाकंभरी नवरात्राच्या प्रारंभी श्री तुळजाभवानी मातेच्या मंचकी निद्रा या कार्यक्रमास मंदिर संस्थानचे पदाधिकारी तसेच मानकरी पुजारी तसेच देवी भक्तगन मोठया संख्येने उपस्थित असतात.तुळजापूर शहरात व्यापारी व मंदिर प्रशासनाकडून शारदीय नवरात्र महोत्सवाची शहरात जय्यत तयारी होत आहे. त्या दृष्टीने सर्वस्तरावर उपाय योजना आखण्यात आली आहे. नवरात्र महोत्सावातील मुख्य घटस्थापनेचा विधी रविवारी (दि.१५) मंदिर संस्थचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे, सौ ओम्बासे या दाम्पत्याच्या हस्ते संपन्न होणार आहे. यावेळी भोपे पुजारी मंडळ, पाळकर पुजारी मंडळ, उपाध्ये पुजारी मंडळाचे प्रमुख पदाधिकारी, मंदिराचे महंत तुकोजी बुवा, चिलोजी बुवा व हाब्रोजी आदी उपस्थित असणार आहेत.पलंगे परिवाराचा मान मंचकी निद्रेसाठी देवजींची मुर्ती गार्दीवर ठेवण्यात येते. यासाठी गादी त्यार करण्याचा मान तुळजापूर येथील पलंगे कुटूंबीयांना असतो. कापूस पिंजारी यांचा मान १२ पिडी पासुन चालु आहे. गादी पिंजारी म्हणुन शम्मु बाशि मिया नदाफ व सहकारी कुलकर्णी, लांडगे तसेच यावेळी कापूस पिंजन्यासाठी महिलाही मोठया संख्यणे उपस्थित होत्या. शिंपी यांची ही सातवी पिडी सध्या जनार्धन गणपतराव निकते त्यांचे नातु मंगेश निकते यांच्याकडु चालु आहे.

## अजित पवार यांनी बनावट कागदपत्रे आयोगाला दिली : सिंघवी

नवी दिल्ली : शरद पवार आणि अजित पवार गटांनी शुक्रवारी (६ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेसच्या दाव्याबाबत निवडणूक आयोगाकडे आपली बाजू मांडली. शरद पवार यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी निवडणूक आयोगातील सुनावणीनंतर अजित पवार गट खोटे बोलत असल्याचा दावा केला. यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारही उपस्थित होते. सिंघवी यांनी अजित पवार गटावर चुकीची आणि बनावट कागदपत्रे दिल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, कोणी चुकीची कागदपत्रे दिली तर ती स्वीकारता येणार नाही, असे ते म्हणाले. सिंघवी म्हणाले की, आयोगाला मरण पावलेल्या लोकांची कागदपत्रेही देण्यात आली. काही लोकांनीही सही केली नसल्याचे सांगून नकार दिला आहे. चुकीच्या कागदपत्रांच्या माध्यमातून पक्ष फोडण्याचा प्रयत्न झाला. निवडणूक आयोगातील सुनावणी दोन तास चालली. पहिल्या



भागाची सुनावणी तासभर चालली. राष्ट्रवादी काँग्रेस आणि पक्षाच्या निवडणूक चिन्हावरील अधिकाराबाबत निवडणूक आयोगात सोमवारी (९ ऑक्टोबर) पुढील सुनावणी होणार आहे. शरद पवार यांच्यासह जितेंद्र आव्हाड आणि वंदना चव्हाण आयोगात आले होते, तर अजित पवार यांचे वकील बाजू मांडण्यासाठी आले होते.

## ललित पाटीलच्या भावाचा नाशिकमध्ये ड्रग्ज निर्मितीचा कारखाना

नाशिक : ड्रग तस्कर ललित पाटीलचे प्रकरण राज्यभरात गाजत असताना ललित पाटीलचा भाऊ भूषण पाटीलचा नाशिकस्थित असलेला ड्रग्ज निर्मितीचा कारखानाच उध्वस्त करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांनी ही कारवाई केली असून नाशिक शहर पोलिसांच्या हद्दीत कोट्यवधींचे ड्रग्ज सापडल्याने खळबळ उडाली आहे.काही दिवसांपूर्वीच ड्रग्ज माफिया ललित पाटील पुण्यातील ससून रुग्णालयातुन पोलिसांच्या हाती तुरी देऊन फरार झाल्यानंतर मोठी खळबळ माजली होती. त्यानंतर ड्रग्ज विरोधी कारवाईसाठी पोलिस ॲक्शन मोडवर आले असून याच पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. ललित पाटील हा मूळचा नाशिकचा असून तो फरार झाल्यानंतर नाशिकच्या घरी देखील पोलिसांकडून झाडाझडती घेण्यात येत होती.या माध्यमातून साकीनाका पोलिसांचा तपास सुरु असताना धक्कादायक माहिती समोर आली असून तब्बल तीन दिवसांच्या कारवाईतून नाशिकमध्येच ड्रग्ज बनविण्याचा कारखाना असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. नाशिकमधील श्री गणेशाय इंडस्ट्रीज या कंपनीत ड्रग्ज बनविण्याचे काम सुरु होते. विशेष म्हणजे नाशिक पोलिसांच्या नाकावर टिच्चून ड्रग्ज निर्मिती सुरू होती, त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## २ हजार रुपयांच्या नोटा जमा करण्याचा उद्या शेवटचा दिवस

नवी दिल्ली : भारतीय रिझर्व्ह बँकेने या वर्षी मे महिन्यात २ हजार रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याची घोषणा केली होती. या नोटा बँकेत जमा करण्यासाठी अगोदर ३० सप्टेंबर पर्यंत मुदत देण्यात आली होती, त्यानंतर ही मुदत ७ ऑक्टोबर २०२३ पर्यंत वाढवण्यात आली. आता २ हजार रुपयांच्या नोटा बदलण्याचा उद्याचा ( ७ ऑक्टोबर २०२३) शेवटचा दिवस आहे. अजूनही २ हजारांच्या नोटा शिल्लक असतील, तर त्या बँक शाखेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जमा करण्याची ही शेवटची संधी आहे.आरबीआयची पतधोरण आढावा बैठक ४ ऑक्टोबरपासून सुरू झाली, जी शुक्रवारी संपली आहे. याबैठकाकीनंतर आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी ७ ऑक्टोबर नंतर २ हजारांच्या नोटा कोठे बदलू शकता, याबाबत माहिती दिली आहे. बँक आणि पोस्ट ऑफिसमध्ये ८ ऑक्टोबर २०२३ पासून २ हजार रुपयांच्या नोटा जमा किंवा बदलल्या जाणार नाहीत. रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीच्या निर्णयांची घोषणा करताना दास यांनी सांगितले की, आरबीआयकडे अद्याप २ हजार रुपयांच्या १२ हजार कोटी रुपयांच्या नोटा परत येणे बाकी आहे.बँक खात्यात जमा पहिल्या पद्धतीनुसार, भारतीय टपाल विभागाद्वारे २ हजार रुपयांच्या नोटा आरबीआय इश्यू कार्यालयात पाठवल्या जाऊ शकतात. ही रक्कम फक्त भारतातील त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाऊ शकते.१९ कार्यालयांमध्ये नोटा जमा करू शकता दुसऱ्या पद्धतीनुसार, देशात सध्या असलेल्या आरबीआयच्या १९ इश्यू कार्यालयांमध्ये २ हजार रुपयांच्या नोटा जमा करू शकता. त्यांच्यासाठी नोटा जमा करण्याची मर्यादा नाही. आरबीआयच्या नियमांनुसार या २ हजार रुपयांच्या नोटांसोबत वैध ओळखपत्राची माहिती द्यावी लागेल. एक्सचेंजसाठी २० हजार रुपयांची मर्यादा आहे.

## संपादकीय....

# फर्नांदो बोतेरो

'मी जाडय़ा माणसांची चित्रं काढत नाही'– असे ठासून सांगणाऱ्या फर्नांदो बोतेर–ो या चित्रकाराने १९५९ पासून ते अगदी सप्टेंबरात निधन होईपर्यंत जी काही चित्रे रंगवली, कांस्य–शिल्पे घडवली त्यांमधली सारी माणसे फुगीर चेहऱ्याची आणि पुष्ट, फुगलेल्या अवयवांचीच आहेत. 'मी जाडय़ा माणसांची चित्रं काढत नाही'– असे ठासून सांगणाऱ्या फर्नांदो बोतेरो या चित्रकाराने १९५९ पासून ते अगदी सप्टेंबरात निधन होईपर्यंत जी काही चित्रे रंगवली, कांस्य–शिल्पे घडवली त्यांमधली सारी माणसे फुगीर चेहऱ्याची आणि पुष्ट, फुगलेल्या अवयवांचीच आहेत. चित्रकलेचा गंध नसलेल्या कुणालाही 'बोतेरोची मोनालिसा' चटकन ओळखू येते. बोतेरोने घोडा काढला तर तोही गोबरा–गोबरा, अस्वल तर आणखीच गरगरीत, बोतेरो यांनी शिल्प म्हणून घडवलेला 'रोमन योद्धा' केवळ ढाल–तलवारीमुळे रोमन म्हणायचा– नाही तर तो दिसतो एखाद्या सुमो पैलवानासारखा! अशीच चित्रे बोतेर–ो यांनी का केली, हा प्रश्न चित्रकलेत रस असणाऱ्यांसाठी महत्त्वाचा राहीलच. पण दक्षिण अमेरिकेतल्या कोलंबिया देशाच्या ग्रामीण भागात जन्मलेल्या, वयाच्या १८ व्या वर्षीपर्यंत त्या देशाची राजधानीसुद्धा न पाहिलेल्या फर्नांदो बोतेरो यांना जगभर प्रसिद्धी मिळाली, पॅरिस, न्यू यॉर्क या शहरांतल्या महत्त्वाच्या कला–संग्रहालयांत त्यांची एकल प्रदर्शने भरली आणि अक्षरश: जगभरच्या कला–रसिकांना त्याची शैली ओळखू येऊ लागली, ही कथासुद्धा प्रेरक ठरेल! बोतेरोच्या या शैलीला 'बोतेरिस्मो' अशा स्पॅनिश नावाने ओळखले जाते. 'मी जाडय़ा माणसांची चित्रं नाही काढत' – या बोतेरोच्या विधानाचा अर्थ, जाड नसलेल्या माणसांची मी काढलेली चित्रेदेखील त्या माणसांना जाडसर रूपात चित्रित करतात, असा असल्याचे त्याची चित्रे सांगतील. हे ठसवण्यासाठी त्याने काही लोकप्रिय चित्रांचे स्वत:च्या शैलीतले अवतार सादर केले. उदाहरणार्थ १९७८ सालचे त्याचे 'मोनालिसा'चे चित्र सोबत आहे. ख्रिस्ती धर्मीयांना माहीत असलेली प्रसंगचित्रेही बो–तेरो यांनी या शैलीत रंगवल्यामुळे देवदूतांसह सारे जण गब्दुल झाले, परंतु कुणाच्या भावना दुखावल्याचा आरोप चित्रकारावर झाला नाही. रंग–आकारांवर या चित्रकाराची छान हुकमत आहे, हे त्यांची चित्रे पाहणाऱ्या सामान्यजनांना कळत असे. ज्यांना एवढेही कळत नसे त्यांनासुद्धा त्यांची चित्रे आवडत, याचे कारण म्हणजे चित्रविषयाची सुयोग्य रचना आणि रंगांच्या फिकट छटांतून जाणवणारी प्रसन्नता. मृत्यूने बोतेरो यांना १५ सप्टेंबर रोजी, वयाच्या ९१ व्या वर्षी गाठले, पण जगाला ही वार्ता उशिरा कळली. आयुष्याचा बराच काळ युरोपात, स्पेनमध्ये घालवूनही मृत्यूपूर्वीच त्यांनी बोगोटा (कोलंबियाची राजधानी) आणि मेडेलिन (कोलंबियातले जन्मगाव) येथे संग्रहालये स्थापून, स्वत:च्या चित्र–शिल्पांखेरीज, इतक्या वर्षांत त्यांनी जमवलेल्या पिकासो, दाली आदींच्या कलाकृतीही तेथे ठेवल्या. कोलंबियन लोकांनीही या अनिवासी चित्रकाराला भरपूर प्रेम दिले.

# खरे साधुत्व पंथात नाही!

१९५६ मध्ये त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळय़ात भारत साधुसमाजाच्या अधिवेशनात देशभरातून आलेल्या साधुसंतांसमोर चिंतन व्यक्त करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ''आजदेखील काही साधुसंत समाज–शिक्षणाचे आणि समाजोन्नतीचे फार मोठे कार्य करत आहेत. १९५६ मध्ये त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळय़ात भारत साधुसमाजाच्या अधिवेशनात देशभरातून आलेल्या साधुसंतांसमोर चिंतन व्यक्त करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ''आजदेखील काही साधुसंत समाज–शिक्षणाचे आणि समाजोन्नतीचे फार मोठे कार्य करत आ–हेत. परंतु हेही विसरता येत नाही, की साधूंच्या नावावर अनेक बदमाश वेश पांघरून समाजात वावरत आहेत, ज्यांनी समाजजीवन सुध–ारावे ते स्वत:च भ्रष्टाचार पसरवत आहेत आणि समाजद्रोही लोकांना मोठेपणा मिळवून देत आहेत. या सर्व अनिष्ट गोष्टींना आळा घालणे गरजेचे नाही का? साधुत्वाचे पावित्र्य दूषित करणाऱ्यांची वेसण खेचता येईल, अशी व्यवस्था साधुसमाजाकडून व्हायला नको का? कोण कोणत्या पंथाच्या ना–वावर जगतो एवढय़ावरूनच त्याला महत्त्व न देता, त्याच्या आचारविचारांची कसोटीच महत्त्वाची मानली गेली पाहिजे, असे मला वाटते. कारण साधुत्व ही वृत्ती आहे, वेश नव्हे! मी कोणत्याही वेशाचा वा पंथाचा नाही.''''जनताजनार्दनाची सेवा हाच माझा संप्रदाय! वयाच्या नवव्या वर्षांपूर्वीपासूनच ही दीक्षा मी घेतली आहे!'' सनातनी वृत्ती सोडा, असे सांगून महाराज म्हण–तात, ''सृष्टी परिवर्तनशील आहे आणि गरज ही युक्तीची माता आहे. यामुळेच आवश्यक तेव्हा नवे पंथ, संप्रदाय निर्माण होत गेलेले आहेत. पण जुनेप–णाचा अभिमान धरून बसणे हा मानवी स्वभाव आहे. असे असले तरीही, प्रगतीच्या दृष्टीने ही गोष्ट बाधक



ठरते. पूर्वीच्या काळी देवाला वाहिलेले गुलाबाचे फूल चांगलेच होते; पण आज वाहण्यात येणारे नवे ताजे फूल हे त्याहून कमी दर्जाचे ठरेल काय? 'जुने तेच सोने' समजून कर्मठ मनोवृत्तीने आणि रुढीवादी भावनेने एककल्ली वागणूक इष्ट होणार नाही! ग्रंथांनी युगधर्म सांगितला तो उगीच नव्हे! एका वेळेचे यज्ञयाग आज नामसंकीर्तनात सामावले आहेत. वेद–उपनिषदांनंतर गीता– भागवत् निर्माण होण्यालादेखील तितकाच अर्थ आहे.'' ''केवळ जुन्याचाच अभिमान बाळगायचा असेल तर सर्वात जुने काय आहे, हे शोधावे लागेल आणि मग तुमचा हा एकही पंथ–संप्रदाय त्या कसोटीवर टिकणार नाही! शुद्ध तत्त्वज्ञान मात्र सर्वात जुने आणि नित्य नवे आहे; त्यावरच आपण सर्वांनी दृष्टी केंद्रित केली पाहिजे आणि त्याच्या आधारे आजचे जीवन घडविले पाहिजे. साधुसंतांनो! तुम्ही कोणत्या संप्रदायाचे वा पंथाचे आहात, हे मी विचारत नाही. भारत साधुसमाजात याच, असाही हट्ट मी करीत नाही. परंतु हे लक्षात असू द्या की जर तुम्ही संघटित झाला नाहीत, हरिनामाबरोबरच जनजीवन सुधारण्याकडे लक्ष दिले नाहीत आणि देवाबरोबरच देशाकडे जागरूकतेने पाहिले नाहीत, तर लवकरच एक वेळ अशी येईल की या देशात मंदिरे शिल्लक राहणार नाहीत. मठांवरून ट्रॅक्टर चालविले जा–तील, साधुसंतांची देशद्रोही म्हणून धिंड काढली जाईल आणि ईश्वराचे अस्तित्व मानणाऱ्याला ला–थेखाली तुडविण्यात येईल! 'देव–धर्म सब झूठ' म्हणणाऱ्या लोकांचे प्राबल्य या देशात झपाटय़ाने वाढत आहे आणि हे सारे साधुसंतांच्या उपेक्षेचेच फळ आहे!

# मस्तवाल लोकप्रतिनिधी

नांदेडच्या रुग्णालयातील मृत्यूंस जबाबदार कोण वा त्याची कारणे काय याच्या खोलात जाण्याची ही वेळ नाही. नांदेडच्या शासकीय रुग्णालयात मृत्यूचे थैमान सुरू असताना अधिष्ठात्यांना जबरदस्तीने शौचालय साफ करण्यास लावण्याची शिवसेनेचे शिंदे गटाचे हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांची कृती नुसती निंदनीय नाही तर लोकप्रतिनिधी किती असंवेदनशील असू शकतात याचे ते एक बोलके उदाहरण ठरते. रुग्णालयात बालकांसह अन्य रुग्णांचे होणारे मृत्यू रोखण्यासाठी डॉक्टर व अन्य वैद्यकीय कर्मचारी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असताना रुग्णालयाचे प्रमुख असलेल्या अधिष्ठात्यांना जबरदस्तीने शौचालय साफ करण्यास लावून खासदार पाटील यांनी लोकप्रतिनिधित्वाचा आब राखण्यास आपण किती नालायक आहोत हे दाखवून दिले. नांदेडच्या रुग्णालयातील मृत्यूंस जबाबदार कोण वा त्याची कारणे काय याच्या खोलात जाण्याची ही वेळ नाही. कारण दोन दिवसांमध्ये ५०च्या आसपास रुग्णांचा मृत्यू झाल्यावर दाखल असलेल्या सर्व रुग्णांना योग्य उपचार मिळतील आणि त्यांचे प्राण वाचतील याला प्राधान्य देणे गरजेचे. 'खासदार–आमदार म्हणजे आपल्याला सारे काही माफ' अशी डोक्यात हवा गेलेल्या लोकप्रतिनिधींना आवरणार कोण? भले अधिष्ठाता चुकले असतील वा त्यांचे कामात लक्ष नसेल, पण एकीकडे मृत्यूचे थैमान सुरू असताना सत्ताधारी पक्षाचा खासदार असा आचरटपणा करतो आणि त्यावर सरकारमधील उच्चपदस्थ दोन दिवस उलटले तरी काहीही प्रतिक्रिया व्यक्त करीत नाहीत हे तर आणखी गंभीर. विरोधकांकडून जरा काही खुट्ट झाल्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून आशीष शेलार ते भाजपची गल्लीतील नेतेमंडळी टीकाटिप्पणी, राजीनाम्याची मागणी करण्यासाठी सज्जच असतात. पण महायुतीतील एक खासदार आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना शिवीगाळ करून जबरदस्तीने शौचालय साफ करण्यास लावतो तेव्हा भाजपची पत्रकबाज नेतेमंडळी गप्प का? खासदार हेमंत पाटील हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील. आपल्या पक्षाच्या खासदारा–ने लाजिरवाणे कृत्य केल्यावर मुख्यमंत्र्यांकडून निषेधाचा साधा सूर उमटेल अशी अपेक्षा होती, पण तीही फोल ठरली. आता बरीच ओरड झाल्यावर खासदारांवर गुन्हा दाखल झाला. पण त्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना रस्त्यावर उतरावे लागले किंवा 'मार्ड' या निवासी डॉक्टरांच्या संघटनेला आंदोलनाचा इशारा द्यावा लागला. हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील काय किंवा याच जिल्ह्यातील कळमनुरीचे शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर हे सारेच दिव्य. आमदार बांगर यांनी आधी सरकारी अधिकाऱ्याला मारहाण केली. नंतर शासकीय तंत्रनिकेतनच्या प्राचार्यांना शिवीगाळ आणि मारहाण केली. मारहाण केल्यावर गुन्हा दाखल करण्याची औपचारिकता केली जाते. पण परत दमदाटी करण्यास हे आमदार महाशय मोकळे. शिंदे गटातील प्रकाश सुर्वे, सदा सरवणकर असे अनेक आमदार मारहाण, गोळीबार, अपहरण यांसारख्या प्रकरणांमध्ये वादग्रस्त ठरले आहेत. पण मुख्यमंत्री शिंदे यांनी पक्षप्रमुख किंवा राज्याचे प्रमुख या नात्याने स्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या कृत्यांचा ना निषेध केला, ना या लोकप्रतिनिधींची कानउघाडणी केली. कदाचित राजकीय अपरिहार्यतेतून खासदार–आमदारांचे गैरकृत्य मुख्यमंत्री शिंदे यांना पोटात घालावे लागत असावे. सरकारी अधिकारी आपलेच नोकर असल्याचा बहुतांशी खासदार वा आमदारांचा आविर्भाव असतो. आपण सांगू तसेच अधिकाऱ्यांनी ऐकले पाहिजे ही लोकप्रतिनिधींची अपेक्षा असते. त्यातून हे प्रकार घडतात. भाईंदरच्या आमदार गीता जैन यांनी पालिका अधिकाऱ्यांना भर रस्त्यात कानशिलात लगावली. बच्चू कडू तर त्यासाठी प्रसिद्धच आ–हेत. वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी पालिका आयुक्तांनाच सर्वासमक्ष दमदाटी केली. सरकारी अधिकारी वा कर्मचारी १०० टक्के बरोबर आ–हेत, असा दावा कधीच करता येणार नाही. लोकप्रतिनिधींनी सामान्य लोकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न मांडल्यास त्यावर कार्यवाही करणे हेच सरकारी अधिकाऱ्यांकडून अपेक्षित असते. पण पैसे मोजून पदावर आलेले अधिकारी आपल्याच तोऱ्यात वावरतात. त्यातूनही लोकप्रतिनिधींमधील





उद्वेग बाहेर पडतो. तरीही कायदा हातात घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना कोणी दिलेले नाहीत. सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना '३५३ ए' कलमानुसार संरक्षण देण्यात आले आहे. पण 'या कलमाचा अधिकाऱ्यांकडून गैरवापर केला जातो,' असा सूर सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी लावताच यावर पुढील तीन महिन्यांत सुधारणा करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनाच्या काळात विधानसभेत दिले होते. सरकारी अधिकाऱ्यांना कायद्याचे संरक्षण असताना लोकप्रतिनिधींकडून हात उचलला जातो. उद्या हे संरक्षण गेल्यास लोकप्रतिनिधींचा मस्तवालपणा वाढेल ही अधिकारी आणि कर्मचारी संघटनांची भूमिका रास्तच आहे. सरकारी अधिकारी वा कर्मचारी चुकत असल्यास त्यांच्याविरोधात नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. त्यांना शिवीगाळ वा मारहाण करण्याचा अधिकार कोणाला दिलेला नाही. वैद्यकीय अधिष्ठात्यांना शौचालय साफ करण्यास भाग पाडणारे खासदार पाटील यांच्याविरोधात कडक कारवाई व्हावी, म्हणजे भविष्यात अशा घटनांना किमान आळा बसेल.

# बापरे! शाळेतील ९० मुलींना एकाच वेळी अर्धांगवायूचा झटका?

पाहता-पाहता ९० शाळकरी मुली झाल्या लुळ्या पॅरॅलिसिस ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यामध्ये शरीरातील काही अवयव किंवा अर्ध्या भागाच्या हालचाली बंद होतात. त्यामुळे व्यक्तीच्या नैसर्गिक हालचालींवर मर्यादा येतात. अर्धांगवायू, लकवा, पक्षाघात ही एकाच आजाराची वेगवेगळी नावे आहेत. तुमच्या आजूबाजूला किंवा कुटुंबामध्ये एखाद्या व्यक्तीमध्ये ही समस्या उद्‌भवल्याचं तुम्ही ऐकलं किंवा पाहिलं असेल. दरम्यान, आता समोर आलेली घटना हादरवणारी आहे. कारण- एका शाळेत एक नव्हे, दोन नव्हे, तर तब्बल ९० शाळकरी मुलींना अर्धांगवायूचा झटका झाला. हा आकडा ऐकून डॉक्टरही चक्रावले आहेत. तुमचाही यावर विश्वास बसत नाही ना? मात्र समोर आलेला व्हिडीओ पाहून तुमच्याही काळजात धस्स होईल. सोशल मीडियावर या मुलींचा व्हिडीओ व्हायरल झाला आणि हे प्रकरण समोर आलं.९० मुलींना एकाच वेळी लकवा ही संपूर्ण घटना केनिया देशातील एका शाळेतील आहे. येथील काकामेगा काउंटी येथील महाविद्यालयातील ९० विद्यार्थिनींसोबत काहीतरी विचित्र घटना घडली. सेंट थेरेमा एरगी महाविद्यालयातील या विद्यार्थिनी मागील काही आठवड्यांपासून रुग्णालयात दाखल आहेत. एका भयंकर आजारामुळे त्यांच्या शरीरातील कंबरेखालच्या भागाला



अर्धांगवायूचा झटका आल्यासारखे दिसत आहे. हे वृत्त ींळाशीषळपवळर ने दिलं आहे. तखऊएज पाहून उडेल थरकाप मीडिया रिपोर्टनुसार, मुलींना चालण्यास त्रास होत होता आणि गुडघेदुखीची लक्षणं वाटतं होती. हे सगळं अचानक घडल्यामुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. अचानक या मुलींच्या पायांतील ताकदच निघून गेली आहे. अचानक अशी परिस्थिती का उद्‌भवली याची चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, आतापर्यंत मुलींच्या रक्त व लघवीचे नमुने प्रयोगशाळांमध्ये पाठवण्यात आले आहेत. तसेच, शाळेतच असं काही घडलं आहे का, याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, विद्यार्थिनी हॉस्पिटलच्या बेडवर अक्षरश: थरथर कापताना दिसत आहेत. शरिरातील असंतुलनामुळे हा प्रकार घडला का? स्थानिक अहवालानुसार हा आजार शरीरातील द्रवपदार्थांच्या असंतुलनामुळे होऊ शकतो. जेव्हा शरीरातील खनिजांचे प्रमाण खूप कमी किंवा जास्त होते, तेव्हा असे होते. अस्वस्थता, अशक्तपणा, मुंग्या येणे, थकवा, हृदय जोरात धडधडणे, मळमळ किंवा उलट्या, कमी किंवा उच्च रक्तदाब ही असंतुलनाची सामान्य लक्षणे आहेत.

# अजिबात टेन्शन नको घेऊस, 'हास्यजत्रा' फेम निखिल बनेला 'बॉईज ४'च्या सेटवर गौरव मोरेनं केली 'अशी' मदत

'हास्यजत्रा' फेम निखिल बने आणि गौरव मोरेमध्ये आहे 'असं' बॉण्डिंग, अभिनेता खुलासा करत म्हणाला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाद्वारे अनेक नवोदित कलाकार प्रकाशझोतात आले. अभिनेता निखिल बनेलाही या कार्यक्रमामुळे घराघरांत एका वेगळी ओळख मिळाली. लवकरच हा विनोदवीर बहुचर्चित 'बॉईज ४' चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पदार्पण करणार आहे. 'बॉईज ४'मध्ये निखिलच्या साथीला गौरव मोरेदेखील महत्त्वाची भूमिका साकारत आहे. 'बॉईज ४' या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी निखिलने गौरवने त्याला चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान कशी मदत केली याविषयी सांगितलं. निखिल बने म्हणाला, गौरव आणि माझं हास्यजत्रेत एक बॉण्डिंग झालंच आहे पण, आता चित्रपटात सुद्धा आमचं कमाल बॉण्डिंग जमलं. पहिलाच सिनेमा असल्याने मला सुरूवातीला दडपण होतं परंतु, या सगळ्यात मला गौरवने खूप सांभाळून घेतलं.गौरव मला नेहमी सांगायचा तुझा पहिला चित्रपट आहे मला कळतंयतुला भिती आहे, तू दडपणाखाली आहेस पण, तू अजिबात टेन्शन नको घेऊस काही वाटलं तरी मी आहे. आपण एकत्र रिहर्सल करूया. आम्ही दोघंही वर्कशॉप किंवा शूटिंग संपवून पुन्हा हॉटेलला गेल्यावर प्रत्येक सीन एकत्र वाचायचो. पहिलाच चित्रपट असल्याने मोठी जबाबदारी होती. शेवटी सीन चांगलं होणं माझ्यासाठी महत्त्वाचं होतं. असं निखिलने सांगितलं. निखिल पुढे म्हणाला, गौरवने सांगितल्याप्रमाणे आम्ही सीन एकत्र वाचले, मेहनत घेतली आणि बॉण्डिंग खरंच खूप भारी आहे. यापूर्वी गौरवने बऱ्याच चित्रपटांमध्ये काम केलेलं असल्याने त्याला अनेक गोष्टी माहिती होत्या. दरम्यान, बहुचर्चित बॉईज ४ चित्रपट येत्या २० ऑक्टोबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




# आजवर छेड काढणाऱ्या ४ पोरांना धुतलंय, प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीचा खुलासा, म्हणाली, शाळेत असताना

तिने नुकताच एक व्हिडिओ पोस्ट करून तिच्या शालेय जीवनातील काही आठवणी शेअर केले आहेत. मराठी मनोरंजन सृष्टीतील बेधडक आणि स्पष्टवक्तया अभिनेत्रींपैकी एक अभिनेत्री म्हणजे सुरभी भावे. सुरभीने आतापर्यंत अनेक मराठी मालिका आणि चित्रपटांमधून उत्तमोत्तम भूमिका साकारल्या आहेत. तर 'स्वामिनी' या मालिकेमुळे तिला लोकप्रियता मिळाली. या मालिकेतील तिच्या कामाचं खूप कौतुक झालं. सोशल मीडियावर सक्रिय राहून ती तिच्या कामाबद्दलचे अपडेट्स चाहत्यांना देत असतेच पण याबरोबरच समाजात घडणाऱ्या चांगल्या आणि तिला खटकणाऱ्या गोष्टींबद्दलही परखडपणे भाष्य करताना दिसते. तर तिची छेड काढणाऱ्या चार जणांना तिने आतापर्यंत चोप दिला असल्याचा खुलासा केला आहे.सुरभी सोशल मीडिया बरोबरच यू ट्यूबवरही सक्रिय असते. काही दिवसांपूर्वीच तिने स्वतःचा यू ट्यूब चॅनेल सुरू केला आहे. त्यावरती विविध व्हिडिओ शेअर करत आतापर्यंत तिला आलेले अनुभव मोकळेपणाने चाहत्यांना सांगत असते. तर तिने नुकताच एक व्हिडिओ पोस्ट करून तिच्या शालेय जीवनातील काही आठवणी शेअर केले आहेत. ती म्हणाली, मी मुळची कोकणातली आहे. गुहागरची. पहिली ते चौथी माझं शिक्षण गुहागरमध्ये झालं. पण माझ्या आयुष्याला राणी लक्ष्मीबाई सैनिकी शाळेमुळे कलाटणी मिळाली.



ही आशिया खंडातील मुलींसाठीची पहिली सैनिकी शाळा आहे. या शाळेच्या पहिल्या बॅचची मी पास आऊट आहे.याबद्दल अधिक माहिती देताना ती म्हणाली, त्या शाळेत हॉस्टेलमध्ये राहणं अनिवार्य होतं. तिथे अभ्यासाबरोबरच स्विमिंग, योगा, रायफल शूटिंग, कराटे अशा गोष्टींचंही प्रशिक्षण मिळतं. तर त्याशिवाय तिथे सैनिकी प्रशिक्षणही दिलं जातं. त्यामुळे आजवर माझी छेड काढणाऱ्या चार मुलांना मी हाणलं आहे. याचं सगळं श्रेय या शाळेतील ट्रेनिंगला जातं. तर आता तिचं हे बोलणं चर्चेत आलं असून तिच्या हिंमतीचं सर्वजण कौतुक करत आहेत.

# मुलांना जंक फूडपासून दूर ठेवायचंय? मग ट्राय करा या टिप्स

लहान मुलांना कमी वयातच काही चांगल्या सवयी लावणं गरजेचं असतं. लहान वयात मुलांचे हट्ट पुरवणं हे योग्य असलं तरी काही काळानंतर काही ट्रिक्स वापरून त्यांचे वाईट हट्ट पुरवणं बंद करावं लागतं. अनेकजण आठवड्यातील बरेच दिवस घरात जेवण किंवा नाश्त्याएवजी हॉटेलमधील नाश्ता खाणं पसंत करतात. तसंच घरात लहान मुलं असतील तरी रेडी टू इट, मॅगी, ब्रेड किंवा इतर इन्स्टंट पदार्थांवर खर्पीीरपीं त्रेझ भर देतात.सध्याच्या काळामध्ये अनेक मुलांना जंकफूडची र्गीपझ त्रेझ सवय लागल्याचं दिसतं. या सवयी मोडणं अनेकदा पालकांसाठी कठिण होतं. मुलं जंक फूडसाठी हट्ट धरू लागतात. काही मुलं तर जंक फूड मिळालं नाही तरी घरातील जेवण चशरश्र किंवा अन्न खाण्यास नकार देतात. अशा वेळी पालकांचा मोठा गोंधळ उडतो.जंक फूडचा अर्थातच आरोग्यावर मोठा दुष्परिणाम होत असतो. अशात मुलांच्या या हट्टाला कसं समोर जावं. जंक फूडपासून त्यांना कसं दूर करावं असा प्रश्न अनेक पालकांना पडतो. यासाठीच आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगणार आहोत. या टिप्सच्या मदतीने तुम्ही मुलांच्या जंक फूडच्या सवयी कमी करून त्यांना हेल्दी खाण्याकडे वळवू शकता.मुलांना भरपेट आणि आवडीचा नाश्ता द्या सकाळचा नाश्ता हा दिवसभरातील आहारातील एक महत्वाचा भाग आहे. जर मुलांना सकाळी भरपेट नाश्ता दिला तर त्यांना दिवसभर सतत काही ना काही खाण्याची इच्छा कमी होईल. यासाठी त्यांना सकाळी पोटभर नाश्ता करण्यास प्रोत्साहीत करा. तुम्ही देखील त्यांच्यासोबत नाश्त्यास बसा. दररोज एकाच प्रकारचा नाश्ता केल्याने मुलं कंटाळू शकतात आणि जंक फूडचा आग्रह धरु शकतात. यासाठीच त्यांना त्यांच्या आवडीचे पदार्थ घरी बनवून नाश्त्यामध्ये द्या.नाश्ता असो किंवा जेवण मुलांसोबत एकत्र जेवायला बसण्याचा प्रयत्न करा. यावेळी त्यांना जंक फूडमुळे होणारं नुकसान पटवून द्या. यासाठी तुम्ही त्यांना काही उदाहरणं देऊ शकता. तसचं त्यांना




ताटीतील घरगुती पदार्थ, भाज्या, फळं यातील पोषक तत्व आणि त्यातील फायद्याचं महत्व सांगा.मुलांचा हट्ट पुरवण्यासाठी हेल्दी पर्याय निवडा जर तुमचं मुल पिझ्झा, बर्गर किंवा मॅगी तसचं चिप्स अशा पदार्थांचा हट्ट धरत असेल तर तुम्ही त्याला होममेड हेल्दी पदार्थ बनवून देऊ शकता. तुम्ही घरीच भरपूर भाज्या टाकलेला चपातीचा पिझ्झा किंवा शेवयांचा उपमा, व्हेजिटेबल टिक्की, रोस्टेड मखाना किंवा कुरमुऱ्याची भेळ असे पदार्थ देऊ शकता. ज्यामुळे त्याला जंक फूडचा विसर पडेल.तसंच जर तुम्ही घराबाहेर असलात तरी तुम्ही हेल्दी पर्याय निवडू शकता. जसं की फ्रूटी किंवा इतर कोल्ड्रिंकचा हट्ट केल्यास उसाचा रस किंवा ताज्या फळांचा रस द्या. आईस्क्रिमचा हट्ट केल्यास लस्सी किंवा मिल्कशेक देऊ शकता.लहान मुलांना खास करून गोड पदार्थ खाण्याची जास्त आवड असते. अनेक लहान मुलं आईस्क्रिम, चॉकलेट किंवा पेस्ट्री असे पदार्थ खाण्याचे हट्ट करतात. यासाठी तुम्ही घरात काही हेल्दी स्नॅक्सचे पदार्थ तयार करून ठेवू शकता किंवा त्यांना फळं खाण्यास देऊ शकता.मुलं फळं खाण्यास नकार देत असतील तर त्यांना फ्रूट सॅलड तयार करून सुंदर डेकोरेट करून दिल्यास ते आवडीने खातील. तसंच ड्राय फ्रूट लाडू, शेंगदाणा चिक्की, गूळ चणे, मनुका, खजूर असे पदार्थ त्यांना तुम्ही देऊ शकता.लहानपणापासूनच सवयी लावणं मुलं जेव्हा विविध पदार्थ खाण्यास सुरुवात करतात तेव्हा पासूनच त्यांना खाण्याच्या चांगल्या सवयी लावणं गरजेचं आहे. कारण या सवयी आयुष्यभरासाठी असतात. त्यांना विविध भाज्या, फळं आणि वेगवेगळ्या चवीचे पदार्थ खाण्यास द्या आणि ते खाण्यासाठी प्रोत्साहित करा.याशिवाय मुलांना जास्तीतजास्त वेळ विविध ॲक्टिव्हिटीजमध्ये व्यग्र ठेवा. कारण अनेकदा मुलं रिकामी असली की जंक फूड खाण्यासाठी हट्ट करतात. सगळ्यात महत्वाचं म्हणजे मुलांनी जंक फूडसाठी हट्ट करू नये यासाठी सर्वप्रथम पालकांना चांगल्या सवयी असणं गरजेचं आहे.

# मनातील न्यूंन गंड फेऊन देवून संधीच सोन करायला शिका - डॉ सुरेश वाघमारे

लातूर :- आपण गरीब आहोत ग्रामीण भागातील आहोत मागास आहोत दलीत आहोत अशा प्रकारचा न्युन गंड न बाळगता आलेल्या संधीच सोन करायला शिका असे प्रतिपादन डॉ सुरेश वाघमारे यांनी केले लातूर येथील मागासवर्गीय मुलांचे शासकीय ( गुणवंत) वसतिगृहात आयोजित वार्षिक कार्यशाळा व पालक विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते या प्रसंगी विचार पीठावर वसतिगृहाचे गृहपाल पवन बारकुल प्रा देवदत्त सावंत संकेत बनसोडे हे होते या प्रसंगी पुढे बोलताना डॉ वाघमारे म्हणाले आज





शिक्षण गुणवत्ता ही कुणाचीही मक्तेदारी राहिली नाही कष्ट हाच गुणवत्तेचा पासवर्ड आहे त्यामुळे त्या आधारे यश मिळवता येते पणं त्या अगोदर मनातील न्युन गंड काढून टाकला पाहिजे हा न्युन काढला म्हणून देशात झालेल्या पहिल्या ीिलि परीक्षेत दलीत मुलगा देशात पहिला आला प्रांजल पाटील ह्या देशातील पहिल्या अंध कलेक्टर झाल्या नांदेड येथील झोपडपट्टीत राहणारा दलीत मुलगा सूरज यंगडे हावर्ड युनिव्हर्सिटीत पदवी परीक्षेत पहिला आला जागतिक कीर्तीचे विचारवंत डॉ ख्रिस्तोप यांच्या मार्गदर्शनाखाली सदिप बडोले यांनी पी एच डी संपादन केली यांचा आदर्श डोळ्या समोर ठेवा आई वडील यांच्या कष्टाचा विसर पडू देवू नका त्यांच्या डोळ्यात तुमच्या विषयी असलेले स्वप्न ओळखा असे केलात तर यश तुमच्या मागे चालत येईल या प्रसंगी प्रा देवदत्त सावंत यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले तसेच महादेव माळभगे व महादेव वाघमारे या पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहपाल पवन बारकुल यांनी केले तर सूत्र संचलन व आभार अमित कतुरे यां नी मानले या कार्यक्रमास पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लहान मुलांची एकाग्रता वाढवण्यासाठी फॉलो करा 'या' टिप्स

रोजच्या धावपळीच्या आयुष्यात घर आणि ऑफिसमध्ये काम करताना बऱ्याचदा दमायला होतं. आहार, व्यायाम आणि मेडिटेशन या गोष्टींसाठी वेळ काढला तर त्याचा आपल्याला फायदा होतो. त्यामुळे, प्रौढांसोबतच लहान मुलांनी ही व्यायाम करणे गरजेचे आहे. खेळण्याच्या माध्यमातून अनेक मुलांचा व्यायाम होतो. मात्र, रोज खेळणं होतचं असे नाही. माहिती आणि मनोरंजनाचे अनेक पर्याय उपलब्ध झाल्यामुळे लहान मुले देखील एकलकोंडी होत चालली आहेत. त्यांची एकाग्रता कमी होत चालली आहे. त्यामुळे, अभ्यासात लक्ष न लागणे अशा तक्रारी सुरू झाल्या आहेत.आयुर्वेदामध्ये लहान मुलांची एकाग्रता वाढण्यासाठी आणि त्यांचे लक्ष केंद्रित होण्यासाठी काही आयुर्वेदिक टिप्स सांगितल्या आहेत. कोणत्या आहेत या आयुर्वेदिक टिप्स ? चला तर मग जाणून घेऊयात.शंखपुष्पी शंखपुष्पी ही आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. या वनस्पतीमध्ये मोठ्या प्रमाणात पोषकघटकांचा आणि औषधी गुणधर्मांचा समावेश आढळतो. या वनसप्तीचा उपयोग स्मरणशक्ती वाढवण्यासाठी देखील केला जातो.तणाव आणि चिंता दूर करण्यासाठी ही वनस्पती फायदेशीर आहे. तसेच, एकाग्रता आणि लक्ष केंद्रित करण्यासाठी या वनस्पतीचा उपयोग केला जातो. या वनस्पतीचा उपाय करण्यासाठी अर्धा चमचा शंखपुष्पी एक ग्लास कोमट पाण्यात



मिसळून त्याचे सेवन करू शकता.ब्राह्मी ब्राह्मी ही सर्वात प्राचीन वनस्पती आहे. ब्रेन टॉनिक म्हणून या वनस्पतीला ओळखले जाते. अनेक औषधांमध्ये या वनस्पतीचा आवर्जून वापर केला जातो. लहान मुलांची स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढवण्यासाठी या वनस्पतीचा आवर्जून वापर केला जातो.

# चेहऱ्यावरील फॅट्स कमी करण्यासाठी रोज करा फेस योगा;जाणून घ्या 'हे' फायदे

चेहऱ्यामुळे आपले व्यक्तिमत्व आकर्षक आणि सुंदर दिसते. शरिरासोबतच आपण चेहऱ्याची काळजी देखील चांगल्या प्रकारे घेतो. चेहरा सुंदर आणि आकर्षक दिसण्यासाठी आपण चेहऱ्यावर अनेक प्रकारच्या ब्युटी ट्रीटमेंट्स करतो.या ट्रीटमेंट्समुळे चेहरा आकर्षक दिसतो आणि चेहऱ्यावर चमक ही येते. मात्र, वाढलेल्या वजनाचा प्रभाव ही चेहऱ्यावर दिसून येतो. तो प्रभाव आपण किती ही ब्युटी ट्रीटमेंट्स केल्या तरी टाळता येत नाही. यासाठी तुम्हाला व्यायाम करणे आवश्यक आहे.फेस योगा हा चेहऱ्याचा व्यायाम करण्याचाच एक प्रकार आहे. फेस योगा नियमित केल्याने चेहऱ्यावरील डबल चिन गायब होण्यास मदत मिळू शकते. तसेच, चेहरा टोन्ड दिसण्यासाठी फेस योगा फायदेशीर आहे.आज आपण, फेस योगा म्हणजे काय ? आणि फेस योगा करण्याचे फायदे काय आहेत ? ते जाणून घेणार आहोत.फेस योगा म्हणजे काय ? आपले वजन वाढल्यावर आणि वय वाढल्यावर त्याचा प्रभाव चेहऱ्यावर दिसू लागतो. चेहऱ्यावर डबल चिन येणे आणि वाढत्या वजनामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या दिसणे या गोष्टी चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागतात.या सर्व गोष्टींचा प्रभाव कमी करण्यासाठी फेस योगाचा आधार घेतला जातो. फेस योगा केल्याने आपल्या चेहऱ्यावरील स्नायूंना ताण बसतो आणि ते घट्ट होण्यास मदत मिळते.फेस योगा केल्याने चेहऱ्यावरील रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते.

# तेलकट त्वचेमुळे त्रस्त आहात? मग तांदूळ आहे मदतीला! जाणून घ्या 'हे' होममेड स्क्रब्स

तेलकट त्वचेच्या अनेक समस्या असतात. तेलकट त्वचेमुळे चेहऱ्यावर पुरळ, काळे डाग आणि ब्लॅकहेड्स येण्याचा धोका देखील संभवतो. त्यामुळे, ज्यांची तेलकट त्वचा आहे, त्यांना त्वचेची खास काळजी घ्यावी लागते. तेलकट



त्वचेच्या या समस्या दूर करण्यासाठी अनेक जण स्किनकेअर प्रॉडक्ट्सचा आधार घेतात.मात्र, केमिकलयुक्त प्रॉडक्ट्स वापरण्यापेक्षा जर तुम्ही घरगुती होममेड स्क्रब्सची मदत घेतली तर याचे नक्कीच फायदे तुम्हाला मिळू शकतील. हे घरगुती स्क्रब्स तेलकट त्वचा स्वच्छ करतात आणि त्वचा निरोगी ठेवण्यास मदत ही करतात.तेलकट त्वचा स्वच्छ करण्यासाठी त्वचेतील मृत पेशी आणि अतिरिक्त तेल काढून टाकण्याची गरज असते. हे घरगुती स्क्रब्स या कामी आपली मदत करतात. शिवाय, त्वचेचे नुकसान होण्यापासून संरक्षण देखील करतात. आज आपण अशाच काही घरगुती स्क्रब्सबद्दल जाणून घेणार आहोत जे खास तेलकट त्वचेसाठी बनवण्यात येतात. लिंबू-साखरेचे स्क्रब लिंबामध्ये व्हिटॅमिन सी असते. ज्यामुळे, त्वचेला भरपूर फायदे मिळतात. लिंबामुळे त्वचा फ्रेश आणि ग्लोईंग दिसते. लिंबाच्या रसामध्ये असलेला एन्झाईम घटक हा त्वचेतील छिद्रांना घट्ट करण्याचे काम करते. यामुळे त्वचेतील अतिरिक्त तेल निघून जाण्यास मदत होते.हे स्क्रब तयार करण्यासाठी १ चमचा लिंबाचा रस घ्या, त्यामध्ये २ चमचे ब्राऊन शुगर आणि १ चमचा मध मिक्स करा. आता हे सर्व मिश्रण एकत्र करा, तुमचे स्क्रब तयार आहे. या स्क्रबने चेहरा १० मिनिटे स्क्रब करा, नंतर चेहरा पाण्याने धुवून टाका.संत्र्याचे स्क्रब तेलकट त्वचेसाठी संत्रा हे अतिशय फायदेशीर आहे. संत्र्यामध्ये असलेले पोषक घटक हे त्वचेमध्ये तयार होणाऱ्या तेलाला नियंत्रित करतात. शिवाय, त्वचेवर उजळपणा देखील येतो.संत्र्याचे स्क्रब तयार करण्यासाठी १ चमचा संत्र्याच्या सालीची पावडर घ्या.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी घेतला विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालयाचा आढावा

**विविध वार्ड, स्वच्छतागृहांची पाहणी; औषध साठ्याची पडताळणी**










लातूर, दि. ०६ (जिमाका) : येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील आरोग्य सुविधेचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज आढावा घेतला. रुग्णालयातील प्रत्येक वार्ड, विभागाची त्यांनी पाहणी केली. सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांनी रुग्णालयात येणारे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांच्याशी सुसंवाद ठेवण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. तसेच रुग्णालयातील आवश्यक सुविधा, उपलब्ध औषध साठ्याची माहिती घेतली. तब्बल तीन तास जिल्हाधिकारी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी करीत होत्या. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांच्यासह विविध वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी रुग्णालयातील सर्व स्वच्छतागृहांची पाहणी केली. तसेच ही स्वच्छतागृहे नियमितपणे स्वच्छ करण्याच्या सूचना केल्या. यावेळी त्यांनी रुग्णालयातील विविध वार्डांची पाहणी केली. याठिकाणी उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांशी, त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांनी रुग्णालयातील सुविधांबाबत त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झालेल्या एक महिलेच्या आईशी संवाद साधून तिच्या मुलीच्या तब्येतीबाबत विचारपूस केली.

'सीपीआर' विषयी जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवा

हृदयविकाराचा झटका आल्याने होणारे मृत्यूंचे प्रमाण कमी व्हावे, त्यांना वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामार्फत जिल्ह्यात विशेष जनजागृती मोहीम राबवून नागरिकांना मार्गदर्शन करावे. यामध्ये हृदयविकाराचा झटका आल्यास काय करावे, अशा रुग्णांना वेळीच कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन (सीपीआर) कसा द्यावा, याबाबतची माहिती देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

नेत्रदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करा

मोतीबिंदूसारख्या आजाराचे आणि डोळ्यांच्या इतर आजारांचे प्रमाण सध्या वाढत आहे. लहान मुलांमध्येही हे आजार दिसून येत आहेत. जिल्हा मोतीबिंदू आजारापासून मुक्त करण्यासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने विशेष मोहीम राबवावी. तसेच मृत्यू पश्चात नेत्रदानासाठी जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी घेणार औषध साठ्याचा नियमित आढावा

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपलब्ध औषधी साठ्याची माहिती घेतली. तसेच 'ई-औषध' पोर्टलवर नियमितपणे ही माहिती अपडेट करण्याच्या सूचना दिल्या. यापुढे औषध साठ्याचा आपण नियमित आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रुग्णालयाच्या ओपीडीमध्ये दररोज १६०० ते १७०० रुग्णांची तपासणी केली जाते. तसेच सुमारे २२ ते २५ प्रसूती होतात. यामध्ये सीझरचे प्रमाण ५० टक्केपर्यंत असते. रुग्णालयात आवश्यक औषधी साठ्यासाठी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत, सीटी स्कॅनची सुविधा सुरु करण्यात आली आहे. तसेच नवीन एमआरआय मशीनसाठी पाठपुरावा सुरु असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. जोशी यांनी दिली.

## प्रा.विजयकुमार मांदळे यांना इंडियन एज्युकेशन वार्ड व राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्कार



लातूर : येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा.विजयकुमार संदिपान मांदळे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्कार -२०२३ आणि एज्युकेशन कनेक्ट प्लस भारतातील टॉप १०० शिक्षकांच्या श्रेणीमध्ये प्रशंसा व सन्मानयुक्त असा ' इंडियन एज्युकेशन वार्ड-२०२३ पुरस्कार मिळालेला आहे.शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थीहित लक्षात घेऊन त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हे दोन्ही पुरस्कार मिळालेले आहेत. प्रा.विजयकुमार मांदळे यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी अभिनंदन व कौतुक केले.त्याचबरोबर पुरस्कार मिळाल्याबद्दल दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांच्या शुभ हस्ते त्यांचा शाल व बुके देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षक डॉ.संध्या कोल्हे,रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,प्रा.बळवंत सूर्यवंशी,सीईटी समन्वयक प्रा.कविता जाधव,डॉ.महादेव पंडगे,डॉ.प्रमोद माने,प्रा.हेमलता सलगर,प्रा. सतीश नागटिळक,प्रा.बबन नराळे,डॉ.राजेंद्र पांचाळ,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,डॉ. रामशेट्टी शेटकार,अमोल क्षीरसागर यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले तर सत्कार केल्याबद्दल प्रा.विजयकुमार मांदळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## डेंग्यूवर प्रतिबंध व उपाययोजना करा मुख्याधिकाऱ्यांना चाकूरकरांचे साकडे



चाकूर (सुशिल वाघमारे): चाकूर शहरांमध्ये बऱ्याच ठिकाणी अस्वच्छतेचे प्रमाण वाढले असून मच्छरांचे प्रमाण वाढल्यामुळे डेंगू सदृश्य आजाराने शहरामध्ये थैमान घातले असून या रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे नगरपंचायतीचे मुख्याधिकारी नरळे यांना चाकूरातील नागरिकानी एका निवेदनाद्वारे प्रतिबंध करण्याचे साकडे घातले आहे.

शहरांमध्ये मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात डेंगू व मलेरिया सदृश्य रुग्णात वाढ होत असल्यामुळे व एक रुग्ण अतिदक्षता कक्षात आसल्याचेही निवेदनात सांगितल्यामुळे या आजाराचा त्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून डेंगू सदृस्य रुग्णांची दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे याबाबत प्रशासनाची मात्र उदासीनता दिसत असून खबरदारीचा उपाय म्हणून लवकरात लवकर शहरांमध्ये न्यूआन फवारणी करण्यात यावी. त्याप्रमाणेच वेळोवेळी नालेसफाई ,बीएससी पावडर टाकण्यात यावे व नागरिकांना सतर्क करण्यासाठी प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात असेही या पत्रात निवेदनकर्त्यांनी लेखी दिले आहे. याची योग्य ती दखल घ्यावी अन्यथा निवेदनकर्त्यांच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर शहरातील विजय शंके, दीपक जनवाडे, शिवकुमार गादगे ,दीपक पताळे ,शेखर शेटे ,प्रसाद देशमुख, राजकुमार गादगे, मनोज सूर्यवंशी, प्रकाश धोंडगे, अजय धनेश्वर, आकाश फुलारी, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## राजेंद्र दादा गायकवाड यांचा अभिसष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा






नवीमुंबई / के.एच.हनवते:- दिनांक:०६-१०-२३रोजी आर पी आय (ए) गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या सह पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवी मुंबईतील सानपाडा रेल्वे स्थानक परिसरात नवनियुक्त नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेंद्र (दादा) गायकवाड यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास राज्यभरातील सामाजिक, राजकीय मान्यवरांनी उपस्थित राहून राजेंद्र दादा गायकवाड यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिता ताई चव्हाण, भाजपाचे ज्येष्ठ नेते दशरथ भगत, स्थानिक माजी नगरसेवक नरेंद्र वासकर, आर पी आय (ए) पक्षाचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार, कार्यालयीन प्रमुख तानाजी (आप्पा) मिसळे, नवी मुंबई उपाध्यक्ष मिलिंद राऊत यांच्यासह रंगभूमी आघाडीचे कलाकार व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमास दिवंगत शाहीर सम्राट प्रल्हाद शिंदे यांचे सुपुत्र चंद्रकांत शिंदे यांच्या भीम गीतांचा प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाद्वारे राजेंद्र गायकवाड यांनी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील पक्षाची ताकद दाखविण्यात आली.

## मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीसाठी नेमलेली समिती ११ ऑक्टोबरपासून मराठवाड्याच्या दौऱ्यावर

मुंबई,दि.६: मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यासाठी गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) व समिती सदस्य हे ११ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर २०२३ याकालावधीत छत्रपती संभाजीनगर विभागाचा जिल्हानिहाय दौरा करणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात विभागीय आयुक्तांना पत्र पाठवून समितीच्या जिल्हानिहाय दौऱ्याचे वेळापत्रक कळविले आहे. या दौऱ्या दरम्यान, समितीचे अध्यक्ष व सदस्य कामकाजाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागातील (मराठवाडा) सर्व जिल्ह्यांमध्ये बैठक घेणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्याकडील उपलब्ध निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसूली पुरावे, निजाम काळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी, राष्ट्रीय दस्तावेज इ. समितीस उपलब्ध करुन देण्यात यावीत, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

समितीच्या बैठकीचे वेळापत्रक असे: समितीची पहिली बैठक छत्रपती संभाजीनगर येथे बुधवार दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय येथे होणार आहे. त्यानंतर जालना येथे जिल्हाधिकारी कार्यालयात दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक घेण्यात येणार आहे. दि. १६ ऑक्टोबरला परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११.०० वाजता समितीची बैठक होणार आहे. त्यानंतर हिंगोली येथे दि.१७ ऑक्टोबरला सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे, नांदेड येथे दि. १८ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११.०० वाजता ही बैठक होणार आहे. दि.२१ ऑक्टोबरला लातूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११.०० वाजता, धाराशिव येथे दि.२२ ऑक्टोबरला सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे तर बीड येथे दि. २३ ऑक्टोबरला सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात समितीची बैठक होणार आहे.

## एकमेकांकडून शिकण्यासाठी केलेले प्रयत्न अंतर्गत एकमेकांकडून शिकणे व प्रगतशील शेतकरी अभ्यास भेट' ता. लोहा



अहमदपूर प्रतिनिधी / राठोड रमेश पंडित

लोहा :- लोहा तालुक्यातील १४ गटांचा अभ्यास दौरा तालुक्यातील शेलगाव येथील जय दुर्गा माता महिला शेतकरी गट व बळीराजा शेतकरी गट यांच्या शेतात आयोजित करण्यात आला. या दौऱ्यामध्ये खालील गट सहभागी झाले. १.श्रद्धा महिला शेतकरी गट, पिंपळगाव २. जय किसान महिला शेतकरी गट, गोलेगव ३.संघर्ष महिला शेतकरी गट , गोलेगाव ४.गोमातेचे संव्हर्धन हेच आमचे जीवन, गुंडेवाडी ५. अन्न दाता सुखी भव , सायाल ६. नारीशक्ती महिला शेतकरी गट,बोरगाव को ७.प्रगती महिला शेतकरी गट,पारडी ८.हायटेक शेतकरी गट, टेळकी ९.संत अगडमबुवा शेतकरी गट, कलंबर बू .संत बाळूमामा शेतकरी गट, गुंडेवडी .भक्ती महिला शेतकरी गट , पळशी .अन्न दाता सुखी भव १ , सायाळ१३.संकल्प शेतकरी गट , निळा .शिवशंकर शेतकरी गट, दापशेड खालील बाबी पाहण्यात आल्या. कापुस पीक व त्याच्या ड्जझ पालन केल्याने झालेला पिकामध्ये बदल. . बेसल डोस चे महत्व. शिवार फेरी दरम्यान ीचिी अंमलबजावणी केलेला प्लॉट व ीचिी अंमलबजावणी न केलेला प्लॉट याचा फरक शेतकऱ्यांना दिसून आला.

शिवार फेरी दरम्यान पुर्व मशागती पासून ते आज पर्यत केलेल्या ीच्यिा अमलबजावणी मुळे उत्पादन खर्चात झालेली बचत विषयी माहिती देऊन त्या पासून होत असलेल्या फायदे विषयी माहिती देण्यात आली. इत्यादी बाबी गटातील सदस्यांनी शिवार फेरी दरम्यान पाहिल्या. शिवार फेरी संपल्या नंतर गटातील सदस्यांचा मुक्त संवाद व्हावा यासाठी एक व्यासपीठ तयार करण्यात आले होते. याचाही सर्वांनी पूर्ण उपयोग करत सर्वांनी विचारांची देवाणघेवाण केली. विचारांची देवाणघेवाण करत असताना गटात आल्यापासून आलेले अनुभव गटांनी मांडले. व नक्कीच आम्हाला आज अभ्यास भेटी मुळे भरपूर असे शिकण्यास मिळाले. या ज्ञानाचा वापर करून आम्ही आमच्या खर्चात बचत करू व उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करू. यावेळी पानी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक मा.संतोष शिनगारे सर यांनी यापुढेही आपण एकत्र येऊन काम करून शेती समृद्ध करण्यासाठी एकमेकांना मदत करणे विषयी व पशुसंवर्धन व फळबाग, सोयाबीन कापूस.डिजिटल शेती शाळेच्या माध्यमातून आपण व आपल्या गावातील शेतकरी गटांना प्रोत्साहन, करणे त्याच बरोबर ही चळवळ मोठी करण्यासाठी आपण जास्तीत जास्त लोकांनी दोन दिवसीय प्रशिक्षण घ्यवे यावीषयी मार्गदर्शन केले. कृषी विभागाचे नेहमीच सहकार्य लाभते या वर्षी सुध्धा अनेक गटांना कामगंध सापले मिळाले,त्याच बरोबर मार्गदर्शन ही वेळोवेळी गटांना मिळते. कृषी सहाय्यक सौ. कावळे मॅडम व आत्मा चे श्री सोहेल सर कमल उडवाडीया फाउंडेशन विको सत्वचे आर्चना मँडम धनश्री मँडम पाणी फाउंडेशन चे तालुका समन्वयक राजाभाऊ कदम सर सतीश भिसे सर या कार्यक्रमास उपस्थित होते. अभ्यासभेट यशस्वी होण्यासाठी शेलगाव च्या जय दुर्गा माता महिला शेतकरी गट व बळीराजा शेतकरी गट यांनी सुंदर नियोजन केले .चाहा व अल्प आहाराची उत्तम व्यवस्था करून ही अभ्यासभेट यशस्वी होण्यासाठी दोन्हीही गटांनी मोलाचे सहकार्य केले. सर्वांनी एकत्रितपणे चहा व नाष्टाचा आस्वाद घेतला. लोहा तालुक्यातील वरील गटांनी अगदी आनंदच्या वातावरणात यात सहभागी होऊन ही अभ्यास भेट यशस्वी केली. गटातील सर्व सदस्यांनी या अभ्यास भेटी बद्दल आनंद व्यक्त केला..सर्वांचे खूप खूप अभिनंदन...

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE